| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | २३/१०/२०१९ |
| नोंदणी दिनांक | : | ११/११/२०१९ |
| निकाल दिनांक | : | २१/०३/२०२३ |
| कालावधी | : | ३व. ४म. १९दि. |

**अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश बारामती जिल्हा पुणे यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी आर.के. देशपांडे, बी.एस.सी.,एलएल.एम)**
**(जिल्हा न्यायाधीश - ४)**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं.९९/२०१९** **नि.क्र.१**

**श्री. बापु दत्तु लोखंडे**
वय ७७ वर्ष, धंदाः निवृत्त,
रा. एन.डी.ए. खडकवासला, उत्तमनगर,
पुणे - ४११ ०२३
तर्फे कुलमुखत्यारधारक
**श्री. विक्रम बापु लोखंडे**
वय ३८ वर्ष, धंदाः नोकरी,
रा. एन.डी.ए. खडकवासला, उत्तमनगर,
पुणे - ४११ ०२३ **...अर्जदार**

**विरुध्द**

१. **श्री. शामराव केसू गावडे मयत तर्फे वारस**
**अ. श्री. आप्पा शामराव गावडे**
वय – सज्ञान, धंदाः शेती,
**ब. बापुराव शामराव गावडे**
वय – सज्ञान, धंदाः शेती,
**क. लक्ष्मण शामराव गावडे**
वय – सज्ञान, धंदाः शेती,
**ड. लिलाबाई शिवाजी खोमणे**
वय – सज्ञान, धंदाः गृहिणी,
**इ. लिलाबाई मच्छिंद्र आटोळे**
वय – सज्ञान, धंदाः गृहिणी,
**फ. हौसाबाई धोंडिराम मेरगळ**
वय – सज्ञान, धंदाः गृहिणी,
**ग. पार्वतीबाई शामराव गावडे**
वय – सज्ञान, धंदाः शेती,

**२. सौ. देवई आप्पा गावडे**
वय – ४७ वर्ष, धंदाः गृहिणी,

**३. सौ. कुसुम बापु गावडे**
वय – ४७ वर्ष, धंदाः गृहिणी,
रा. गाव मौजे मेडद, बारामती, पुणे **...जाब देणार**

**अर्जः उशीर माफीचा अर्ज**

---

अर्जदारातर्फे वकील **पी.एम. वाघमारे**
जाब देणार तर्फे वकील **आर.ए. जगताप**

---

**न्यायनिर्णय**
(घोषित दिनांक २१ मार्च, २०२३)

अर्जदारांनी सदरचा विलंब माफी करीता या न्यायालयात दाखल केला आहे.

२. अर्जदार असे कथन करतात की, अर्जदार यांनी जाब देणार यांचे विरुध्द बारामती येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात स्पे.मु.नं.२/२००० दाखल केलेल्या दाव्यातील नि.क्र.१ मधील कलम १ मध्ये नमूद असलेली वाद मिळकत ही अर्जदार यांचे स्वकष्टार्जित खरेदी मालकीची असल्याने ठराव करुन मिळणेसाठी वर नमूद केलेला दावा जाब देणार यांचे विरुध्द ठरावासाठी व ताब्यासाठी दाखल केला होता.

३. अर्जदार पुढे असे कथन करतात की, सदरील दाव्यात मे. दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बारामती यांनी दिनांक १२/०२/२००२ रोजी त्यांचा न्यायनिर्णय व हुकुमनामा पारित करुन अर्जदार यांचा दावा फेटाळलेला होता. त्यानंतर प्रस्तुत अर्जदार यांनी सदर निकालाचे विरुध्द मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात प्रथम अपिल दाखल केलेले होते. सदर अपिलाचा नंबर १८७२/२००२ असा होता. तथापि दरम्यानचे कालावधीत बॉम्बे सिव्हील कोर्ट अमेंडमेंट ॲक्ट, २०११ (महाराष्ट्र ॲक्ट XIV 2011) तसेच बॉम्बे सिव्हील कोर्ट अमेंडमेंट ॲक्ट, १८६९ मधील कलम २६ मध्ये झालेल्या दुरुस्तीनुसार रु.१०,००,०००/- व त्यावरील आकारणी असलेले अपिल चालविण्याचा अधिकार मा. नामदार उच्च न्यायालय, मुंबई यांना असल्याने सदर अपिलाची आकारणी ही रु.१०,००,०००/- च्या आतमध्ये असल्याने सदरचे अपिल मा. नामदार उच्च

न्यायालय, मुंबई यांनी मे. जिल्हा व सत्र न्यायालय, बारामती यांचेकडे वर नमूद केलेल्या कारणास्तव वर्ग करण्याचा आदेश केलेला होता. त्यानुसार दिनांक ०६/०९/२०१२ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायालय, बारामती यांनी सदर अपिलास रेग्युलर / नियमित अपिल नं.१३९/२०१२ असा नव्याने नंबर देऊन सदर अपिल मे. जिल्हा व सत्र न्यायालय, बारामती यांचे कोर्टात वर्ग करण्यात आलेले होते.

४. दरम्यान सदरील अपील क्र.१३९/२०१२ दिनांक ०६/०९/२०१२ रोजी प्रथम बोर्डावर घेण्यात आले व त्यादिवशी न्यायालयाने आपणाहून अर्जदार अर्थात त्याला व जाब देणार ह्यांना नोटीसा काढण्याचा आदेश पारीत केला होता. परंतु अर्जदाराला सदरहु नाटीस न मिळाल्याने प्रस्तुत प्रकरणाची कसलीही माहिती त्याला नव्हती. अशा परिस्थितीत न्यायालयाच्या संबंधित लिपीकाने अर्जदार व त्यांचे वकील हजर आहेत असे चुकीचे अनुमान काढून दिनांक ०६/०९/२०१२ ते २३/११/२०१५ पर्यंतचा रोजनामा लिहिलेला आहे. अर्जदार पुढे असे नमूद करतो की, दिनांक २८/०९/२०१५ च्या रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, त्यादिवशी अर्जदार व जाब देणार ह्यांना नोटीसा पाठविण्यात आल्या होत्या. असा रोजनामा जरी लिहिण्यात असला तरी संबंधित लिपीकाने अर्जदाराला कधीही नोटीस पाठविली नाही व त्यामुळे अर्जदारातर्फे कोणीही हजर नसताना अपिलार्थी / अर्जदारातर्फे हजर असा चुकीचा रोजनामा लिहिण्यात आला. अर्जदाराने संबंधित लिपिकाने सदर प्रकरणाचा रोजनामा लिहितांना केलेल्या चुकीचा ऊहापोह करीत असे नमूद करीतो की, त्यांना सदर प्रकरणाची नोटीस मिळाली की नाही ह्या विषयीची कसलीही खातरजमा न करता दिनांक ०३/१०/२०१६ रोजी संबंधित न्यायालयाने अपीलार्थी/अर्जदार व त्यांचे वकील गैरहजर असल्याने त्यांचे ते अपील खारीज (dismiss) केले आहे.

५. अर्जदारांचे असे कथन आहे की दिनांक ०३/१०/२०१७ रोजी पारीत केलेले आदेशाचे व दाव्यातील रोजनाम्याचे अवलोकन केले असता स्पष्ट दिसून येते की, सदर अपिल मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जिल्हा व सत्र न्यायालय बारामती यांचेकडे गुण दोषांवर प्रस्तुत प्रकरणाचा निर्णय होणेसाठी पाठविलेले होते, ही बाब या अर्जदार यांना माहित नसल्यामुळे व मा. नामदार उच्च न्यायालयात अर्जदार यांचे वतीने अपिलाचे कामकाज पाहण्याकरीता नेमणूक केलेले वकील हौशिंग यांनी देखील सदरचे अपिल मा.

उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयातून जिल्हा व सत्र न्यायालय, बारामती यांचेकडे वर्ग करण्यात आल्याची कसलीही माहिती या अर्जदार यांना न दिल्यामुळे अर्जदार हे सदर प्रकरणात बारामती येथील न्यायालयात हजर राहू शकलेले नव्हते, त्यामुळे बारामती न्यायालयाने दिनांक ०३/१०/२०१७ रोजी चुकीच्या लिहिल्या गेलेल्या रोजनाम्यामुळे अपिलार्थी व त्यांचे वकील गैरहजर राहिल्यामुळे सदर अपिल क्र.१३९/२०१२ खारीज (Dismissed for default) करुन ते अपिल कामकाजातून काढून टाकलेले आहे. त्यामुळे सदरचा आदेश नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने (set aside) रद्द करणे अत्यंत आवश्यक आहे. सदर प्रकरणात अपिलार्थी यांना न्यायालयाने नोटीस न काढल्यामुळे या अर्जदार यांना त्यांची बाजू मांडण्याची संधीच उपलब्ध झालेली नव्हती. वस्तुतः सदरील प्रकरण वर्ग झाल्याबाबतची कसलीही माहिती अर्जदार यांना नसल्यानेच अर्जदार येथील न्यायालयात हजर राहू शकले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सदरची वस्तुस्थिती ही संयुक्तिक योग्य व बरोबर आहे. त्यामुळे सदरचे कामी सदरचा आदेश रद्द बातल करुन सदरचे अपिल सुनावणीसाठी पुन्हा फैलावर घेणे आवश्यक आहे.

६. अर्जदार पुढे असे कथन करत आहे की, तो वयोवृध्द आहे व आज मितीस त्यांचे वय ७० वर्ष असून ते खूप वर्षांपासून खडकवासला उत्तमनगर पुणे येथे कायमस्वरुपी राहण्यास स्थायिक झालेले आहेत. तसेच सदरचे अपिल बारामती येथील न्यायालयात वर्ग झाल्याची नोटीस या अर्जदारास कधीही मिळाली नव्हती. तसेच सदर या प्रकरणात अर्जदार यांना संबंधित बेलीफ यांनी नोटीसा न बजावल्यामुळे योग्य व खरा न्याय झालेला नाही.

७. अर्जदार पुढे कथन करतात की, दिनांक ०३/१०/२०१७ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारित करताना न्यायालयाने सदर अपिलातील अभिलेखाचे अवलोकन न करताच, संबंधित लिपीक यांनी चुकीचा रोजनामा लिहिल्याने सदरचा आदेश पारित केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सदरचा दिनांक ०३/१०/२०१७ रोजीचा आदेश रद्द होणे अत्यंत आवश्यक आहे.

८. अर्जदार पुढे कथन करतात की, दरम्यानच्या काळात त्यांनी वेळोवेळी त्यांचे उच्च न्यायालयातील वकील हौशिंग यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांचा त्यांचेशी

संपर्क होऊ शकला नाही. अर्जदार यांनी शेवटी उच्च न्यायालयातील अपिलाची माहिती मिळविणे करीता अन्य वकीलांची सहाय्यता घेतली तेव्हा दिनांक १०/०८/२०१९ रोजी सदरील अपिल मे. जिल्हा व सत्र न्यायालय, बारामती यांचेकडे वर्ग झाल्याची व सदरील अपिल काढून टाकल्याची बाब या अर्जदार यांना प्रथमच समजल्यानंतर अर्जदार यांनी तात्काळ दिनांक १३/०८/२०१९ रोजी प्रमाणित प्रतिसाठी अर्ज दिलेला होता व आहे. त्यानंतर दिनांक १७/०८/२०१९ रोजी अर्जदार यांना नि.क्र.१ व त्यावरील आदेशाची प्रमाणित प्रत मिळालेली आहे. तसेच अर्जदार हे वयोवृध्द असल्याने त्यांना वकील साहेबांना भेटून माहिती, कागदपत्रे देणे यांस वेळ लागल्यामुळे सदरचा अर्ज करणेकामी अर्जदार यांस काही दिवसांचा उशीर झाला आहे, असे मे. कोर्टाचे मत झाल्यास सदरचा उशिर माफ करणे गरजेचे आहे.

९. अर्जदार पुढे कथन करतात की, अर्जदार यांनी सदर अपिलात नि.क्र.१ वर पारित केलेल्या आदेशाची माहिती दिनांक १०/०८/२०१९ रोजी प्रथम समजल्यानंतर अर्जदार यांनी तात्काळ दिनांक १३/०८/२०१९ रोजी प्रमाणित प्रतीसाठी अर्ज दिलेला होता व आहे. त्यानंतर दिनांक १७/०८/२०१९ रोजी अर्जदार यांना नि.क्र.१ व त्यावरील आदेशाची प्रमाणित प्रत मिळालेली आहे. तसेच अर्जदार हे वयोवृध्द असल्याने त्यांना वकील साहेबांना भेटून माहिती, कागदपत्रे देणे यांस वेळ लागल्यामुळे सदरचा अर्ज करणेकामी अर्जदार यांस ७४० ते ७५० दिवसांचा झालेला उशीर माफ करणे गरजेचे आहे. त्याकरीता अर्जदार यांनी प्रस्तुतचा उशिर माफीचा अर्ज दाखल केलेला आहे.

१०. अर्जदार पुढे कथन करतात की, सदरचे कामी अर्जदार यांना वर नमूद केलेल्या कारणास्तव दिनांक १०/०८/२०१९ रोजीपर्यंत न्यायालयाने दिनांक ०३/१०/२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशाची माहितीच नव्हती तसेच ज्या दिवशी माहिती झाली त्या दिवसांपासून सही शिक्याचे नकला मिळवून अर्जदार यांनी तात्काळ प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे. अशाप्रकारे वर नमूद केलेल्या योग्य व संयुक्तिक कारणांमुळे अर्जदार यांना दिनांक ०३/१०/२०१७ रोजी पारित केलेला आदेश रद्द बातल करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल करण्यास साधरणत ७४० ते ७५० दिवसांचा विलंब झालेला आहे व त्यामागील कारण हे पुरेसे योग्य व बरोबर आहे. त्यामुळे सदरच्या कामी झालेला उशीर माफ करण्यात येऊन सदर उशीरा माफी अर्जासोबत दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८

मधील ऑर्डर ४१ रुल १९ नुसार दाखल केलेला किरकोळ अर्ज दाखल करुन घेऊन रेग्युलर अपिल नं. १३९/२०१२ पुन्हा सुनावणीसाठी फैलावर घेणे न्यायाच्या दृष्टीकोनातून अत्यंत आवश्यक आहे. यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे

११. सर्व जाब देणार ह्या प्रकरणी हजर झाले असून त्यांनी अर्जदारांचे ह्या अर्जाला त्यांचे लेखी कथन **नि.क्र.१८** अन्वये सादर केले आहे. अर्जदारांनी त्यांच्या ह्या अर्जात ज्या काही महत्वाच्या बाबी नमूद केल्या आहेत, त्या त्यांना मान्य नसल्याचे जाब देणार यांनी नमूद केले आहे. जाब देणार असे नमूद करतात की मूळ जाब देणार शामराव केसु गावडे हे दिनांक १७/०७/२००७ रोजी मयत झाले असून त्यावेळी सदर प्रकरण मा. उच्च न्यायालयात प्रलंबित होते व त्यामुळे त्या दरम्यान मृतक शामराव यांचे वारस अभिलेखावर न घेतल्याने ते अपील अबेट झाले आहे. दरम्यान अबेट झालेले सदर अपील हे बारामती येथील जिल्हा न्यायालयात वर्ग झाले होते. अशा परिस्थितीत ते अपील हे अगोदरच अबेट झाले असल्यामुळे ते चालविण्याचे काही प्रयोजन राहत नाही असे जाब देणार यांचे म्हणणे आहे.

१२. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले. अभिलेख चाळले. ह्या अर्जाच्या अंतिम निर्णयाप्रत जाण्याकरीता खालील मुद्दे हे ह्या न्यायालयासमोर उपस्थित झाले आहेत. त्या मुद्दयांना मी माझा निष्कर्ष खालील कारणमिमांसेद्वारे देत आहे

| अ. क्र. | वाद मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अर्जदाराने विलंब माफी साठी नमूद केलेली कारणे योग्य व संयुक्तिक वाटतात काय...? | | होकारार्थी |
| २ | काय आदेश ? | | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ व २ करीताः

१३. वास्तविक पाहता अर्जदार/वादी यांनी त्यांचा मूळ दावा, ज्याचा क्रमांक **विशेष दिवाणी दावा क्र.२/२०००** असा होता, जाब देणार /प्रतिवादी यांचे विरुध्द वाद मिळकती ह्या अर्जदार यांच्या स्वकष्टार्जित खरेदी मालकीच्या असल्याने तसा ठराव करुन व त्याच्या ताब्याकरिता दिवाणी न्यायाधीश (व.)स्तर यांच्या न्यायालयात दाखल केला

होता, परंतु तो दावा संबंधित न्यायालयाने दिनांक १२/०२/२००२ रोजी आपला न्यायनिर्णय पारीत करुन खारीज केला होता व संबंधित न्यायालयाच्या न्यायानिर्णयाने व्यथित होऊन अर्जदार/वादी यांनी संबंधित न्यायालयाच्या न्यायनिर्णयाला मा. उच्च न्यायालयात त्यांचे प्रथम अपील ज्याचा क्रमांक १८७२/२००२ असा होता, ते दाखल केले होते ही बाब वादातीत नाही. परंतु सदर प्रथम अपीलांची आकारणी ही रक्कम रु.१०,००,०००/- च्या आत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशानुसार सदर प्रथम अपील जिल्हा न्यायालय, बारामती येथे वर्ग करण्यात होते व त्यानंतर प्रथम अपीलास नियमित दिवाणी अपील क्र. १३९/२०१२ असा नवा क्रमांक होऊन दिनांक ०६/०९/२०१२ पासून सदर प्रथम अपीलाची ह्या न्यायालयात नोंद होऊन हे अपील पुढील सुनावणी करीता नेमण्यात आले, ही बाब अभिलेखावरुन स्पष्ट होते.

१४. अर्जदार / वादींनी अभिलेखाच्या रोजनाम्याविषयी ह्या अर्जात नमूद केलेली बाब लक्षात घेता असे दिसते की दिनांक ०६/०९/२०१२ रोजी संबंधित न्यायालयाने दोन्ही पक्षांना आपणहून नोटीसेस जारी कराव्यात असा आदेश पारीत केला होता व त्यानुसार दिनांक १५/१०/२०१५ रोजी जाब देणार / प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या वकीलांनी त्यांचे वकीलपत्र **नि.क्र.४** पत्ता पुरसिस **नि.क्र.५** व प्रतिवादी मृत्यु पावल्याची लेखी सूचना **नि.क्र.६** अन्वये अभिलेखावर दाखल करण्यात आली होती. परंतु त्यानंतर अर्जदार/वादी ह्यांना वारंवार नोटीस पाठवून देखील दिनांक ३०/०३/२०१६ पावेतो अर्जदारावर न्यायालयाच्या नोटीसची बजावणी होऊ शकली नाही. एवढेच नव्हे तर सदर दिवाणी अपील खारीज केल्या तारखेपावेतो अर्जदार/ वादी ह्यांना न्यायालयाच्या नोटीसची बजावणी झाली होती व ते न्यायालयात समक्ष हजर होते व त्या आशयांची सूचना त्यांनी अभिलेखावर दिली होती, असे अभिलेख दर्शवित नाही.

१५. इथे महत्वाचे असे की, ज्यावेळी हे प्रथम दिवाणी अपील मा. मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित होते, त्याच दरम्यान अर्थात दिनांक १६/०६/२००६ रोजी मूळ प्रतिवादी क्र.१ शामराव केसु गावडे यांचा मृत्यु झाल्याची बाब जरी प्रतिवादींनी त्यांच्या लेखी उत्तरामध्ये नमूद केली असली तरी, त्या आशयाची सूचना ज्यावेळी हे अपील मा. मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित होते, त्यावेळी मा. उच्च न्यायालयाला अथवा

अर्जदाराला दिल्याचा उल्लेख अभिलेखावर नाही. त्याचप्रमाणे अर्जदाराला ह्या अपीलाची नोटीस प्राप्त न होताच सदर दिवाणी अपील संबंधित न्यायालयाने दिनांक ०३/१०/२०१७ रोजी खारीज केल्याने, प्रतिवादीच्या वतीने जरी प्रतिवादी क्र.१ हा मृत्यु पावल्याची लेखी सूचना नि.क्र.६ अन्वये दिनांक १५/१०/२०१५ रोजी न्यायालयाला जरी दिली असल्याचे अभिलेख दर्शवित असले तरी वर नमूद कारणांचा विचार करता तसेच अर्जदाराची ह्या अपील प्रकरणातील गैरहजेरी लक्षात घेता ह्या प्रकरणी ह्या बाबींकडे न्यायालयाला ह्या क्षणी गांभीर्याने पाहता येणार नाही.

१६. अर्जदाराचे कथन पाहता असे दिसते की त्यानी मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेले अपील बारामती येथील जिल्हा न्यायालयात वर्ग करण्यात आल्याची कल्पना त्याला नव्हती. त्या दरम्यान मा. उच्च न्यायालयातील संबंधित वकीलांना संपर्क केला असता अर्जदार याचा व त्याच्या वकीलांचा संपर्क होऊ शकता नाही व त्यामुळे अर्जदाराने उच्च न्यायालयातील अन्य एका वकीलांची सहायता घेतली असता त्यावेळी त्यांना सदर अपील हे जिल्हा न्यायालय बारामती येथे वर्ग केल्याची व त्यानंतर सदर अपील बारामती येथील न्यायालयाने दोन्ही पक्षांच्या अनुपस्थितीमुळे खारीज केल्याचे माहिती मिळाली होती. इथे असे नमूद करणे आवश्यक आहे की ज्यावेळी अर्जदाराने मा. मुंबई उच्च न्यायालयात जे अपील दाखल केले होते ते मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बारामती येथील जिल्हा न्यायालयात वर्ग झाल्याची माहिती अर्जदाराचे मुंबई येथील वकीलांनी अर्जदाराला त्वरेने देणे अपेक्षित होते. परंतु अर्जदाराचे कथन लक्षात घेता त्यांनी तसे केल्याचे दिसत नाही. थोडकयात अर्जदाराच्या वकीलांनी त्यांचे अशिलाबाबत असलेले व्यावसायिक कर्तव्य पार पाडल्याचे प्रथमदर्शनी दिसत नाही.

१७. वास्तविक पाहता न्यायालयाने सदरहु अपील खारीज केल्याचा आदेश दिनांक ०३/१०/२०१७ रोजी पारील केल्याची माहिती दिनांक १०/०८/२०१९ रोजी सर्वप्रथम त्यांना कळल्याचे समजल्याचे व त्यानंतर आवश्यक ती कारवाई करुन सदर अर्ज हा ह्या न्यायालयात दिनांक २३/१०/२०१९ रोजी दाखल केल्याचे दिसते.

१८. अशा परिस्थितीत अर्जदाराने केलेले कथन, सदर अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण, नमूद सर्व परिस्थितींचा सर्वांगाने विचार करता तसेच दाव्याचे एकंदरीत

स्वरुप पाहता हा अर्ज न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या मूळ खटल्याचे अपीलाचे निवारण हे गुणवत्तेच्या आधारे व्हावे असे ह्या न्यायालयाला वाटते. अशा परिस्थितीत अर्जदाराने विलंब माफी साठी नमूद केलेली कारणे ही या न्यायालयाला योग्य व संयुक्तिक असल्याने, मुद्दा क्र. १ ला हे न्यायालय आपला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे व आपला आदेश खालील शब्दात पारीत करीत आहेः

## आदेश

१. अर्जदाराने दाखल केलेला हा दिवाणी किरकोळ अर्ज नं. ९९/२०१९(*बापू दत्तु लोखंडे विरुध्द शामराव केसू गावडे मयत तर्फे आप्पा शामराव गावडे व इतर*) मान्य करण्यात येत आहे.

२. अर्जदाराने ह्या अर्जाचा खर्च म्हणून एकूण रु.५००/- प्रत्येकी (रुपये पाचशे फक्त) सर्व जाब देणार यांचे नावे सहा आठवडयात न्यायालयात जमा करावे.

३. खर्चाची पूर्ण रक्कम रु.४,५००/- न्यायालयात जमा केल्यानंतर अर्जदाराने या अर्जासोबत दाखल केलेल्या मूळ अपीलाचे पुर्न-जीवीत होण्याचा (Restoration application) अर्जाची नोंदणी करण्यात यावी.

४. दिवाणी किरकोळ अर्ज नं.९९/२०१९ निकाली काढण्यात आला.

RAJENDRA KESHAVRAO DESHPANDE
Digitally signed by RAJENDRA KESHAVRAO DESHPANDE
Date: 2023.04.05 12:20:33 +0530

बारामती.
दिनांक – २१/०३/२०२३

(आर.के.देशपांडे)
जिल्हा न्यायाधीश – ४ व अति.सत्र न्यायाधीश,
ता. बारामती, जि. पुणे

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word for word as per original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mrs. B.J. Khandre(Steno G-1) |
| Court Name | : | R.K. Deshpande,<br>District Judge-4 and<br>Additional Session Judge,<br>Baramati, Dist. Pune. |
| Date of Order | : | 21/3/2023 |
| Order typed on | : | 31/03/2023 |
| Order signed by<br>Presiding Officer | : | 05/04/2023 |
| Order PDF/ uploaded on | : | 05/04/2023 |